# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 July 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चार जणांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती केली आहे. यामध्ये प्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम, सामाजिक कार्यकर्ते सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला आणि इतिहासतज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचा समावेश आहे. गृह मंत्रालयाने या निर्णयाची माहिती देणारी अधिसूचना जारी केली. महाराष्ट्रातील जळगावचे मूळ रहिवासी असलेले उज्वल निकम यांनी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यात अतिरेकी अजमल कसाब याला फाशीची शिक्षा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

केरळचे सदानंदन मास्टर यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हर्षवर्धन शृंगला यांनी अमेरिका, बांगलादेश आणि थायलंडमध्ये राजदूत म्हणूनही काम केले आहे. डॉ. मीनाक्षी जैन या दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमध्ये इतिहासाच्या सहयोगी प्राध्यापक आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वकील उज्ज्वल निकम, सदानंदन मास्टर, हर्षवर्धन शृंगला आणि मीनाक्षी जैन यांचे राज्यसभेवर नामांकन झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे. समाज माध्यमांवरील संदेशाद्वारे मोदी यांनी म्हटले आहे की, उज्ज्वल निकम यांनी संविधान आणि कायद्याच्या क्षेत्रात अनुकरणीय योगदान दिले आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी जुलै महिन्याच्या शेवटच्या रविवारी अर्थात २७ तारखेला सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रम मालिकेतून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीसह दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारीत होईल. या कार्यक्रमात प्रस्तुत करण्यासाठी महत्वाच्या मुद्द्यांबाबत

जनतेच्या सूचना मागवण्यात येत असून शुक्रवार दिनांक २५ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना आपलं मनोगत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य - अकरा - सात आठ शून्य शून्य याद्वारे व्यक्त करता येईल.

****

एक्सिओम-चार अभियानांतर्गत चौदा दिवसीय आंतराळ प्रवासासाठी गेलेले ग्रुप कैप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे अन्य तीन सहप्रवासी उद्या आपला परतीचा प्रवास सुरू करणार आहेत. परवा, मंगळवारी भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी तीन वाजता हे चौघे पृथ्वीवर पोहोचतील. शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

****

भारतीय आयुर्वेद वैद्यकीय पद्धतीतील शल्यक्रियेचे जनक आचार्य सुश्रुत यांच्या जयंतीच्या निमित्तानं नवी दिल्ली इथं अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे तीन दिवसीय 'शल्यकॉन २०२५' या राष्ट्रीय परिसंवादाला आज प्रारंभ झाला. परिसंवादात उद्या होणाऱ्या मुख्य सोहळ्याला केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय आयुर्वेद संस्था तिच्या स्थापनेपासून जगभरात आयुर्वेदाचा प्रचार करण्यासाठी समर्पित असून, यंदाच्या शल्यकॉन परिसंवादात आयुर्वेदाची मूलतत्त्वे आणि आधुनिक शस्त्रक्रिया यांचे एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात येत आहे. आजच्या चर्चासत्रात थेट शस्त्रक्रिया प्रात्यक्षिके सादर होत आहेत. नावीन्यता, एकात्मता आणि प्रेरणा या संकल्पनेवर परिसंवाद कार्यक्रमात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम असणार आहे.

****

भारतीय पारंपरिक वैद्यकीय उपचार पध्दती विशेषत: आयुष पध्दतीमध्ये ए.आय. - कृत्रिम बुध्दीमत्तेच्या वापरास जोडलं जाणं हे एक महत्वपूर्ण पाऊल असल्याचं जागतिक आरोग्य संघटना- डब्लु. एच. ओ.नं म्हटलं आहे. आपल्या एका अहवालात डब्लु.एच.ओ.नं आयुर्वेद, योग, प्राकृतिक चिकित्सा, यूनानी, सिद्ध, सोवा रिग्पा आणि होमिओपॅथीच्या उपचारांमध्ये ए.आय.चा प्रभावीपणे अवलंब होत असल्याचं नमूद केलं आहे. यासंदर्भात केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भारत नवतंत्रज्ञानातून, संशोधनातून सिद्ध आणि प्रमाणित होत

असलेल्या पारंपरिक अशा उपचारांना अग्रेसर करण्यात वचनबद्ध असल्याचं म्हटलं आहे. आयुषच्या विविध संकेतस्थळांच्या माध्यमातून याला हातभार मिळत आहे.

****

यवतमाळ इथं प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख माजी आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांची सातबारा कोरा यात्रा सुरू आहे. यात्रेच्या आज सातव्या दिवशी स्वतः बच्चू कडू आणि पदयात्रेत सहभागी शेतकरी– शेतमजुरांनी डोळ्यावर काळ्या पट्ट्या बांधून सहभाग नोंदवला.

रोज शेतकरी, दिव्यांग, भोई, मेंढपाळ यांच्यावर अन्याय होत असून राज्य शासनाला हे दिसत आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यासाठी यात्रा काढण्यात आली आहे असं बच्चू कडू यांनी सांगितल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

स्पेनच्या माद्रीद इथं आयोजित धनुर्विद्या विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात काल भारतानं दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली. भारतातर्फे ज्योती सुरेखा वेन्नम हिनं कम्पाउंड प्रकारात वैयक्तिक तसंच सांघिक गटात परनीत कौर पृथिका प्रदीप यांच्यासह दोन रौप्य पदकं जिंकली. याच प्रकारातील संमिश्र गटातही ज्योतीनं ऋषभ यादवसह कांस्य पदक जिंकलं.

****

भारत–इंग्लंडदरम्यान लॉर्डसच्या मैदानावर सुरू असलेल्या तिसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात आज चौथ्या दिवशी इंग्लंडचा संघ आपल्या दुसऱ्या डावात बिनबाद दोन या धावसंख्येवरून आणि तितक्याच धावांच्या आघाडीसह पुढे खेळण्यास प्रारंभ करणार आहे. दुपारी अडीच वाजता खेळ सुरू होईल. सामन्यात पहिल्या डावात इग्लंडनं केलेल्या ३८७ इतकीच धावसंख्या भारतीय संघानेही उभारली होती.

****